## ५. स्त्रीच्या जिवाला जाणवलेला धोका

समुपदेशकाबरोबरचा स्त्रीला स्वतःच्या धोकादायक परिस्थितीची जाणीव असणे आवश्यक असते. आपापल्या परिस्थितीतील धोका ओळखण्याच्या प्रत्येकीच्या स्वतंत्र पद्धती असतात, त्याबद्दलचा हा स्तंभ:

१. जोडीदाराचे वर्तन पूर्वीपेक्षा जास्त हिंसक झाले आहे असे तुम्हाला जाणवले आहे का?

होय/ नाही

२. तुमच्या जिवाला धोका होईल असे काही संशयास्पद बदल घरातील लोकांच्या वागण्यात जाणवत आहे का? होय/ नाही

३. शेजारी किंवा नातेवाईकांनी तुम्हाला कळत नकळत सावध राहण्याचा इशारा दिला का?

होय/ नाही

एकूण गुण:

वरील तक्त्यातील एकापेक्षा जास्त प्रश्नांचे उत्तर ‘होय’ असेल तर धोक्याची पातळी ‘तीव्र’ मानावी. तिला सतर्क व सांभाळून राहण्याचा आग्रह धरावा. माहेरच्या लोकांना परिस्थिती सांगण्याचा सल्ला द्यावा.

*(संदर्भ – ‘चक्रभेद’ – लेखन – मनीषा गुप्ते, अर्चना मोरे – मासूम प्रकाशन – वर्ष १० डिसेंबर २०१०)*